**MHAK100000442026**

**Civil M.A./13/2026**
**Syed Naziruddin Syed Azharuddin Vs. Nil**
निशाणी क्रमांक ०१ खाली आदेश
( दिनांकः—१०.०३.२०२६) .

१) अर्जदाराने सदरचा अर्ज हा बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट कलम ०२ अन्वये वारस प्रमाणपत्र (Heirship Certificate) मिळण्याकरिता दाखल केला आहे.

२) अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* हे अर्जदार क. १ ते २ चे वडील तसेच अर्जदार क. ३ ही पत्नी होती. मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचा मृत्यू दिनांक ०४.०२.२०२५ रोजी पातुर, ता. पातुर जि. अकोला येथे झाला आहे. तसेच मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन यांचे आईवडील हे बरेच वर्षापूर्वी मयत झाले आहेत.* तसेच मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचा कायमचा रहीवास हा पातुर ता. पातुर जि. अकोला येथेच होता. तसेच मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांच्या मृत्युनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराला *मयत सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने त्यांनी सदरचा अर्ज न्यायालयामध्ये दाखल केलेला आहे.

३) अर्जदाराने केलेला अर्ज, परिस्थिती, समोर आलेला पुरावा तसेच अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेला युक्तिवाद यांचा विचार करता या प्रकरणात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होत असून त्यावर सविस्तर कारणमिमांसा देवून मी खालीलप्रमाणे माझा निष्कर्ष आणि निवाडा दिला आहे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अर्जदार हे सिध्द करतात का की, ते *मयत सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचे वारस आहेत? | .......... होय. |
| २. आदेश काय ? | ..........अंतिम आदेशाप्रमाणे |

कारणमिमांसा

मुद्दा क्रमांक १ व २ करिता :

४) अर्जदार क्रमांक १ *सैय्यद नझीरोद्दीन सैय्यद अझरूद्दीन* यांनी त्यांचा पूरावा प्रतिज्ञालेख नि.क्र.०८ वर दाखल केला. अर्जदाराने त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रात त्यांच्या अर्जातील मजकूराचा पुर्नउल्लेख केला आहे. अर्जदाराने मयत *सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचे मृत्यु प्रमाणपत्र नि.क्र. १२ वर दाखल केले, तसेच अर्जदारांचे आधारकार्ड अनुक्रमे नि.क्र. १४ ते १६ वर दाखल केले आहे. अर्जदार यांच्या पुराव्यानुसार ते *मयत सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचे वारस आहेत.

५) दिनांक २५.०१.२०२६ रोजी दैनिक ‘अकोला दर्शन’ वृत्तपत्र नि.क्र.११ मध्ये, चावळीवर व या न्यायालयाच्या सुचना फलकावर अर्जाबाबत जाहिर नोटिस प्रसिध्द करूनही अर्जदारांना *मयत सैय्यद*

*अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र देण्यास कोणीही आक्षेप घेतलेला नाही. अर्जदारचा पुरावा व अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा याला कोणीही आव्हान केलेले नाही. त्यामुळे अर्जदाराला वारस प्रमाणपत्र देण्यास काहीही बाधा दिसून येत नाही. म्हणुन अर्जदाराचा अर्ज न्यायाचे दृष्टीने मंजुर करणे योग्य राहील. त्यामुळे मी मुद्दा कमांक १ चे उत्तर होकारार्थी देतो व मुद्दा कमांक २ च्या उत्तरात खालील आदेश पारीत करीत आहे :—

## आ दे श

१) अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२) अर्जदार क.१— *सैय्यद नजीरोद्दीन सैय्यद अजहरोद्दीन* अर्जदार क.२— फिरदौस अंजुम *सैय्यद अफरोजोद्दीन* अर्जदार क.३—शहनाज परवीन *सैय्यद अजहरूद्दीन* हे *मयत सैय्यद अझरूद्दीन सैय्यद हसनुद्दीन* यांचे कायदेशिर वारस आहेत असे प्रमाणपत्र (Heirship Certificate) नियमानुसार न्यायालयीन शुल्क घेऊन देण्यात यावे.

३) अर्जदारांना सदर वारसप्रमाणपत्राचा आर्थिक लाभासाठी उपयोग करता येणार नाही याची नोंद प्रमाणपत्रावर घेण्यात यावी.

PRASAD SAHEBRAO THAKARE
Digitally signed by PRASAD SAHEBRAO THAKARE
Date: 2026.03.12 13:03:19 +0530

( प्रसाद एस. ठाकरे )

दिनांक: १०.०३.२०२६. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word to word as per original .

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | K.M.Mahalle |
| Court Name | : | P. S. Thakare, C.J.J.D. & J.M.F.C., Patur. |
| Date of order | : | 10.03.2026 |
| Signed by presiding officer on | : | 10.03.2026 |
| Uploaded on | : | 12.03.2026 |